पुढारी

## थोडक्यात

# वाडीवस्तीवर राहणाऱ्यांना सोलर दिव्यांचे वाटप



(छाया : हनिफ शेख)

**मोखाडा :** मोखाडा तालुक्यातील अनेक गावपाड्यांवर आजही वीज पोहचली नाही, त्यातच अनेक लोक शेतीच्या कामासाठी झापावर (शेतीच्या ठिकाणी बांधलेली झोपडी) राहायला जातात. तिथे तर विजेचा लवलेशही नाही. या झापावर राहणाऱ्या लोकांच्या घरात दिवा पेटावा या हेतूने दिगंत स्वराज फाऊंडेशन आणि प्रोजेक्ट चिराग या संस्थेकडून प्रति झाप दोन सोलर दिव्यांचे वाटप सभापती प्रदीप वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. या परिसरात दिगंत स्वराज फाऊंडेशन अनेक कामे करत आहेत. अशा संस्था आणि लोकप्रतिनिधी या एकत्र आल्या तर विकासाला गती मिळेल, असा विश्वास वाघ यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी तालुक्यातील विविध गावांतील जवळपास ३०० झापांना सौर दिव्याचे वाटप करण्यात आले. यावेळी स्वराज फाऊंडेशनचे राहुल तिवरेकर, श्रद्धा शृंगारपुरे, चिराग संस्थेचे प्रतिभा पै आणि याना डिसोझा आदी उपस्थित होते.

Virar-Dahanu Shuttle Edition
1 Dec, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com